PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 1, ISSUE 1

# शेतकऱ्यांच्या समस्या आणि मराठी ग्रामीण साहित्य

**डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे**
न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
अहमदनगर महाराष्ट्र भारत

---

**भूमिका :**

भारतीय लोकजीवनाचा विचार केल्यास ‘कृषिप्रधानता’ हे त्याचे मुख्य अंग आहे. आजही मोठया प्रमाणावर कृषि क्षेत्रावर भारतीय लोकजीवन अवलंबून आहे. या क्षेत्रावरच अनेक पिढयांचे पोषण होत आले आहे. मात्र परंपरागत स्वरूपात जीवनाधार असलेल्या या क्षेत्रातील शेतकऱ्याला न्याय मिळाल्याचे दिसत नाही. पूर्वापार दुर्बलता, दु:ख, दारिद्रयात शेतकऱ्यांच्या पिढया पिचलेल्या दिसतात. सुखाचे स्वप्न पाहता—पाहता गळयाभोवती फास अडकवून स्वत:ची सुटका करून घेणे सोईचे वाटावे इतकी उदासीनता शेतकऱ्यांच्यामध्ये आली आहे. आपल्या समस्यांना सोडविण्यात कुणालाच रस नाही त्या सहन करता येत नाही आणि शेती सोडता येत नाही अशा विचित्र मानसीकतेत आजही शेतकरी अडकलेला दिसतो. या संदर्भात कवी प्रकाश होळकर म्हणतात,

‘नक्षत्र संपून जातात कोरडयाहून कोरडे
जुन्या पागोटयाचं बोटं मोजणं थांबत नाही
पंचागातल्या तारखा बदलतात
दिवस काही बदलत नाही.’

हे वास्तव लक्षात घेतल्यास विविध राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे, प्रशासकीय अधिकारी, नोकरदार वर्ग या घटकांसमवेत एकतर्फी लढाई करणारा शेतकरी किती काळ तग धरू शकेल यात शंकाच आहे.

**ग्रामीण साहित्यातून रेखाटलेले वास्तवदर्शन:**

मराठी साहित्याचा विचार करता शेतकऱ्यांच्या दु:खांना वाचा फोडण्याचे काम साहित्यातून वेळोवेळी घडले आहे. तरीही या सर्व समस्या सोडविण्याकडे पावले पडत नाही ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. आधुनिक काळात साहित्यातून मध्यमवर्गीय जीवनाचे चित्र मोठया प्रमाणावर रंगविले जात होते. अशावेळी म. फुल्यांनी सर्वप्रथम शेतकऱ्यांची दु:खे साहित्यातून मांडली. शेतकऱ्यांचे होणारे शोषण त्यांनी पाहिले व त्याला न्याय मिळावा या उदात्त हेतूने हे लेखन केले गेले. ‘शेतकऱ्यांचा असूड’ हे पुस्तक लिहून शेतकऱ्यांच्या जीवनाचे विदारक चित्र उभे करून शोषण करणाऱ्या भटगिरीवर ताशेरेही त्यांनी ओढले. त्यांचा वारसा पुढे चालविणाऱ्या कृष्णराव भालेकर यांनीही त्या काळातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना परखडपणे समोर आणण्याचे मोलाचे कार्य केले. त्यासाठी पोवाडे, उपदेशपर लावण्या, शेतकऱ्यांचे मधुरगायन, कादंबरीलेखन, स्फुटलेखन केले. त्यासाठी प्रयत्नपूर्वक ‘दीनमित्र नियतकालिकही चालविले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अशा प्रकारचे काही लेखन सोडल्यास शेतकऱ्यांच्या समस्यासंदर्भात फारसे इतरांनी केलेले दिसत नाही.

नंतरच्या काळात जे लेखक लिहू लागले त्यांनाही या समाजसुधारकांच्या विचारांपासून प्रेरणा मिळालेली आहे. म्हणूनच ग्रामीण चळवळीचा प्रमुख आधार म्हणून म. फुले यांच्या तत्त्वज्ञानाकडे पाहिले जाते.

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात म.गांधींनी 'ग्रामोध्दार' उपक्रम हाती घेतला. 'खेडयाकडे चला' अशी हाक दिली. त्यामुळे रंजनवादी वृत्तीने लेखन करणारे लेखक खेडयातील उपेक्षित घटकांचे चित्रण करू लागले. शेतकऱ्याच्या जीवनातील वास्तव मांडण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्वकाळात अगदी त्रोटक झाले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र ग्रामीण साहित्याचा प्रवाह गतिमान झाला व संवेदनशीलतेने शेतकरी जीवन समोर आले. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात जे नवीन प्रवाह निर्माण झाले. त्यांच्यामागे एक प्रकारची वैचारिक बैठक आहे. ही वैचारिकता सामाजिक चळवळीपूर्वी प्राप्त झाली. ग्रामीण साहित्याच्या चळवळी संदर्भात देखील हेच म्हणता येईल. १९७७ साली ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीने ग्रामीण तरूण, सृजनशील, संवेदनशील मनाला अंतर्मुख केले आत्मभान दिले. यातूनच अनेक नवशिक्षित तरूण लेखनाकडे वळले. त्यांनी आपण अनुभवलेल्या कृषिजीवनातील अनेक संदर्भ आपल्या लेखणीतून समोर आणले. यांत्रिकीकरण, औद्योगिकीकरणाने शहरीकरणात वाढ झाली. नवे तंत्रज्ञान व यांत्रिक सुविधांमुळे ग्रामीण भागात परिवर्तनाच्या खुणा दिसू लागल्या. शेतीत सुधारणा घडल्याचे चित्र निर्माण होऊ लागले. नवी तंत्रे, पिके, हंगाम यामुळे शेती व्यवसायात बदल घडू लागला. मात्र याचाही दूरगामी परिणाम शेतीत राबणाऱ्यांवर झाला. परंपरागत शेती करणाऱ्यांना नव्या बदलाशी एकदम जुळवून घेणे अशक्य होत होते. परिणामी ग्रामीण समाज व्यवस्थेस हादरे बसण्यास सुरूवात झाली. हे दु:ख मांडण्याचे काम कविता, कथा, कादंबऱ्यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर केले जावू लागले.

शेतीहितासाठी हरितक्रांती, धवलक्रांती अशा योजना सुरू झाल्या तरीही कीडलेली मानसिकता, भ्रष्ट व्यवस्थेमुळे त्याचा फायदा, प्रत्यक्षपणे शेतकऱ्यास मिळण्याऐवजी तो इतरांनाच मिळाला. परिणामी शेतकऱ्याचे व शेतीचे दुष्टचक्र तसेच राहिले. हळूहळू जगाचा पोशिंदा समजला जाणारा शेतकरी कोसळत होता. शेतकरी वर्गच कोलमडल्याने त्यावर आधारित घटकांना जगण्याकरिता नवे पर्याय शोधणे भाग पडले. परिणामी अनेकांनी शहराची वाट धरली. शेतीला काळी आई मानणारा शेतकरी मात्र यापासून मुक्त झाला नाही, तर तेथेच खितपत पडण्याची वेळ त्याच्यावर आली. वीज, दूरध्वनी, माध्यमे अशा अनेकानेक गोष्टींचा प्रसार शहरांमधून होत गेला. मात्र नवनव्या सुधारणांच्या झंझावातात आर्थिक सुबत्ता नसलेला हा वर्ग रूढी परंपरा व धर्मांधता यांनाच बळी पडत गेला. त्यामुळे सभोवती होणारे बदल पाहत असूनही त्याची हतबलता दूर होऊ शकली नाही.

शेतकऱ्यांसमोर या काळातही खेडयातील सावकारी, धरणग्रस्तांचे, विस्थापितांचे प्रश्न, दुष्काळामुळे होणारी होरपळ, शासकीय योजनांकडून घडणारे अपहार आणि शेतकऱ्याला त्याच्यापासून वंचित ठेवण्याची वृत्ती आढळून येत होती. हे लक्षात घेऊन शेतकरी जीवनाचे वास्तव रेखाटण्याचे काम अनेक लेखकांनी केले. बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुदू दे' कादंबरीतून सावकारीचा प्रश्न हिरिरीने मांडला गेला. तर रवी मिस्त्रा यांची 'मोहोळ', स.ग. यादव यांची 'बुडणारा गाव' आणि विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' या कादंबऱ्यांच्या माध्यमातून धरणग्रस्तांच्या व विस्थापितांच्या प्रश्नांना वाचा फोडली गेली शेतकऱ्यांच्या ज्या

पिढया शिक्षण घेऊ लागल्या होत्या. त्यांनाही शैक्षणिक संस्थातून चालणारे गैरव्यवहार तसेच सहकारातून निर्माण झालेल्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत होते. यासंबंधी श्रीराम गुंदेकर यांच्या 'उचल' या कथासंग्रहातून प्रकाश टाकला गेला. त्याप्रमाणेच शासनाच्या कल्याणकारी योजना राबविण्याच्या उपक्रमातील शिक्षणाचे लोण खेडोपाडी आणि तळागाळापर्यंत पोहोचविणे हे किती अवघड काम आहे ते उत्तम बावस्कर यांच्या 'इस्कोट' कथासंग्रहातून प्रत्ययास येते.

पुढे नवीन खुल्या आर्थिक धोरणांचा स्विकार केल्यानंतर तर शेतकऱ्यांची स्थिती आणखी केविलवाणी झाली. परदेशी मालासमोर टिकाव धरणे ही बाब शेतकरी वर्गाला अवघड होऊन बसली. व्यापारी व नोकरशाहीच्या तुलनेत आपले जीवन शेतीचा दर्जा घसरत असल्याने आपण मागे पडत असल्याची भावना त्याच्यामध्ये निर्माण होत गेली. ती आजही अत्यंत तीव्र स्वरूपात आहे. हे वास्तव नाकारता येणार नाही. जागतिक स्तरावरून पाण्यासाठी तिसरे महायुध्द होईल. अशा भाकीतातून पाणी टंचाईच्या संकटांची मांडणी होत असतानाच भारतीय खेडयात असलेली पाणी टंचाई हादरवून टाकणारी आहे. स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली असतानाही शेतकऱ्याच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होत नाही हे मोठे दुर्दैव आहे. ग्रामीण भागातील पाणी प्रश्नाचे भीषण वास्तव, पाण्याची कमी झालेली पातळी, पाण्यासाठी केले जाणारे राजकारण, पाण्यामुळेच विस्थापित व्हावे लागते की काय अशा प्रकारची अनेक संकटे शेतकऱ्यांच्या समस्यांच्या रूपाने उभी आहेत.

सामाजिक वातावरणात अनेक बदल होत असताना शेतकऱ्याला हे बदल स्वीकारणे अशक्य आहे. आर्थिक धोरणांमुळे तो पिचून गेला आहे. उत्पादनाला निश्चित हमी नसल्याने त्याचे प्रयत्न फोल ठरत आहेत. रात्रंदिवस कष्ट करून शेतीला काळी आई म्हणून जपणारा शेतकरी शेतीमालाचा भाव ठरवू शकत नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या बाजारभावात तोटा सहन करून त्याला कसेबसे जगणे क्रमप्राप्त झाले आहे. म्हणून दरमहा निश्चित वेतन देणारी साधी नोकरी त्याला महत्त्वाची वाटते. मात्र शेतीच्या असंतुलनामुळे शेतकऱ्यांच्या मुलांची लग्ने जमविणे देखील जिकीरीचे झाले आहे. एकूणच शेतकरी तरूणांच्या वाताहतीची व्यथा व खुल्या अर्थव्यवस्थेने दडपलेल्या शेतकऱ्यांची कहाणी सदानंद देशमुख यांनी २००२ साली लिहिलेल्या बारोमास मधून मांडली. शेतकऱ्याच्या जीवनातील भीषण वास्तव यानिमित्ताने समोर येऊ लागले..अलिकडे निर्माण झालेल्या सेझच्या प्रश्नाने परत शेती विषयक वातावरण ढवळून निघाले. आपली माय म्हणून जीवापाड जपलेली जमीन दुसऱ्याच्याच घशात जाते की काय असा प्रश्न या निमित्ताने उभा राहिला. याचेही प्रतिबिंब साहित्यात उमटले. शंकर सावकार यांनी लिहिलेल्या 'सेझ' सारख्या कादंबरीतून उद्योजक, त्यांचे दलाल व राजकारणी यांच्या युतीतून प्रसंगी शेतकऱ्यांना धमकावून शेती विकण्यास कसे भाग पाडले जाते याचे वास्तवचित्रण केले गेले. शेतकऱ्यांविषयीची असंवेदनशीलता आजही नष्ट होताना दिसत नाही. केवळ जिवंतपणीच नाहीतर त्याच्या मृत्यूनंतरही मोठा संघर्ष, आंदोलने निर्माण होत नाहीत याविषयी संवेदनशीलतेने काव्य लिहिले जाते जगदीश कदम लिहितात,

'ना आकाश पाताळ एक झाले
ना तलवारी परजल्या गेल्या

ना आंदोलने पेटली
क्वचित् कुठे 'रास्ता रोको'
आणि एखादी फुटकळ कविता !

यातून शेतकऱ्यांचा एकाकी संघर्ष जसा जाणवतो तसाच संघटित नसल्याने होत असलेले दुर्लक्षही जाणवते. ग्रामीण साहित्याचा विचार करता ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू होण्यापूर्वी शेतकरी जीवन, खेडयातील वातावरण हा साहित्यातील विनोदाचा विषय ठरत होता. खेडयातील व्यक्तींचे अशिक्षितपण, त्याची बोली यांना विकृत पध्दतीने समोर आणले जात होते. ही बाब ग्रामीण साहित्याच्या चळवळीने मोडीत काढून शेतकरी जीवनाचे वास्तव रेखाटण्यास सुरूवात झाली. आनंद यादव, रा.रं.बोराडे, वासुदेव मुलाटे, नागनाथ कोत्तापल्ले, मोहन पाटील यांच्या लेखनाची प्रेरणाही ग्रामीण साहित्यिकांना मिळाली. त्यानंतर बाबाराव मुसळे, श्रीराम गुंदेकर, सदानंद देशमुख, इंद्रजित भालेराव जगदीश कदम, श्रीकांत देशमुख, प्रकाश होळकर, केशव देशमुख, भरत दौंडकर, कल्पना दुधाळ यांच्या सारख्या अनेकांनी शेतकऱ्यांचे वास्तव प्रश्न मांडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. केवळ समाजाची वाट पाहून चालणार नाही तर आपले प्रश्न सोडविण्यासाठी 'शीक बाबा शीक लढायला शीक, कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक' अशी भूमिका घेण्याची वेळ आली आहे हे भालेरावांच्या कवितेतून व्यक्त होते.

## संदर्भ :

१. मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९९४
२. मुलाटे वासुदेव, संपादक,'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती २००५
३. ठाकूर रविंद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००१